# जिमखाना अहवाल

जिमखाना उपाध्यक्ष म्हणून श्री.एस.एस.सातारकर, विभागप्रमुख स्थापत्य अभि. काम पाहत आहेत. तसेच श्री.व्ही.बी.शिंदे व श्री.व्ही.एम.कोल्हे सदस्य म्हणून काम पाहत आहेत.

IEDSSA अंतर्गत घेतल्या गेलेल्या १२ विविध खेळ प्रकारामध्ये एकूण ७५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला व चेस, क्रिकेट, बास्केटबॉल, १०० मी रनिंग या स्पर्धांमध्ये विनर व बडमिंटन, खो-खो, टेबल-टेनिस, लांब उडी, ८०० मी रनिंग या स्पर्धांमध्ये रनर व २०० मी रनिंग, ४०० मी रनिंग या स्पर्धांमध्ये तृतीय बक्षीस मिळविले.

IEDSSA अंतर्गत घेतल्या गेलेल्या १२ विविध खेळ प्रकारामध्ये एकूण ५७ विद्यार्थिनींनी भाग घेतला व चेस, बास्केटबॉल, २०० मी रनिंग या स्पर्धांमध्ये रनर व लांब उडी या स्पर्धेमध्ये तृतीय बक्षीस मिळविले

इंटरझोनल- अथलेटिक्स, बास्केटबॉल व क्रिकेट या स्पर्धांमध्ये संस्थेचे संघ सहभागी होत आहेत.

१. मा.श्री.विनोद तावडे, यांच्या निर्देशानानुसार संस्थेत १५ ऑगस्ट २०१४ पासून दररोज सकाळी १०.३० वाजता राष्ट्रगीत ध्वनीक्षेपित होत आहे.
२. कु.भाग्यश्री चोबे हिने Thang-Ta Federation Cup-2014 या राज्यस्तरीय स्पर्धेत Phunaba-Anishuba या स्पर्धेत ५० किलो वजन गटात रौप्यपदक पटकाविले, विशेष म्हणजे हे तिचे व्यक्तिगत ५० वे पदक आहे.
३. IEDSSA या राज्यस्तरीय पदविका क्रीडा संघटनेतर्फे एकूण रु. ३ लाख एवढा निधी क्रिकेट स्टेडियम बांधकाम व रु.३.५० लाख हे बास्केटबॉल मैदान तयार करण्यासाठी संस्थेस प्राप्त होऊन सुसज्य असे स्टेडियम व बास्केटबॉल मैदान तयार झाले आहे.
४. वर्ष २०१३-१४ करिता संस्थेस IEDSSA या राज्यस्तरीय क्रीडा संघटनेतर्फे विशेष क्रीडा विषयक कामगिरीसाठी सतत ति-यांदा पारितोषिक मिळाले.
५. संस्थेत अभियंता दिन साजरा करण्यात आला. यामध्ये प्राचार्य श्री.पी.व्ही.सरोदे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.
६. मा.पंतप्रधान भारत सरकार यांचे निर्देशनानुसार ०२ ऑक्टोबर २०१४ रोजी म.गांधी जयंती निमित्त स्वच्छतेची शपथ संस्थेतील सर्व अधिकारी/कर्मचारी, विद्यार्थी यांना देण्यात आली. याअंतर्गत संस्थेचा परिसर सुशोभित करण्यासाठी झाडांची निगा व सुशोभिकरण, पेव्हिंग ब्लॉक बसविणे इ.कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात आले.
७. किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रफित महोत्सवाअंतर्गत संस्थेमध्ये चित्रफित महोत्सवात ३ चित्रफिती दाखविण्यात आल्या. 'उमेद-पहिले पाउल प्रगतीसाठी' या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम व व्यसनमुक्तीचे उपाय या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.
८. डॉ. अनिल अवचट यांनी सामाजिक समस्यांवर प्रबोधन करण्यासाठी व्याख्यान दिले.
९. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानाअंतर्गत 'मैत्री स्वच्छतेशी' या उपक्रमाअंतर्गत "पाणीपुरवठा व स्वच्छता" या विषयावर प्रदर्शन भरविण्यात आले. यामध्ये संस्थेतील ४५० जणांनी नाव नोंदणी केली.
१०. हरदास हार्ट फाउंडेशन यांच्या 'वरदान' उपक्रमाअंतर्गत संस्थेत Free Cardiopulmonary Resuscitation (CPR) प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.त्यास डॉ.प्रसाद होनप यांनी मार्गदर्शन केले.